आजचा शुभ विचार

""नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-37 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thuseday 10 June 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ३७ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ मंगळवार, दि. १० जुन २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये

# मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची जहरी टीका

## रेल्वे अपघातांना मुंबईतील परप्रांतीयांचे लोंढेच कारणीभूत आहेत

अभीजित कुलकर्णी
पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



रेल्वेमध्ये होणाऱ्या अपघातांना मुंबईत परप्रांतीयांचे येणारे लोंढे कारणीभूत असून, रेल्वेसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी केला आहे. 'मंत्री परदेश दौरे करून तेथे काय पाहतात, हे त्यांनाच माहीत. तेथील रेल्वे आणू नका; पण त्यांच्याकडे अपघात का होत नाहीत, हा विचार तरी आणा' अशी टीका त्यांनी केली. राज ठाकरे हे पुणे दौऱ्यावर असून, मुंब्रा येथे झालेल्या रेल्वे अपघातावरून त्यांनी रेल्वे मंत्रालय आणि प्रशासनावर पत्रकारांशी बोलताना टीका केली. ठाकरे म्हणाले, 'मुंबईत दररोज परप्रांतीयांचे येणारे लोंढे या व्यवस्थेला कारणीभूत आहेत. रेल्वेचा बोजवारा उडाला आहे. मुंबईत लोकलमध्ये लोक येतात कुठून आणि जातात कुठे, काहीही कळत नाही. रेल्वेसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याची रेल्वे मंत्रालयाला सूचना केली होती. त्याचे काय झाले, हे कोणालाही माहिती नाही. मेट्रो, उड्डाणपूल बांधले जात आहेत. पुनर्विकासाच्या नावाखाली उंच इमारती बांधण्यात येत आहेत. मात्र, वाहनतळांची व्यवस्था नाही. मेट्रो, उड्डाणपूल करूनही खासगी वाहनांच्या नोंदी थांबलेल्या नाहीत.' 'मंत्री परदेश दौरे करतात. तेथे जाऊन काय पाहतात हे त्यांनाच माहिती. तेथील रेल्वे आपल्याकडे आणू नका; पण ते रेल्वे चालवतात कशी, त्यांच्याकडे अपघात का होत नाहीत, या मागचा विचार आपल्याकडे घेऊन या. मात्र, त्यासाठी काहीही होत नाही, असे ठाकरे म्हणाले.' मुंबईत अपघात झाला नाही, असा एकही दिवस जात नाही. मुंबईची लोकल कशी चालते, हे आश्चर्य आहे. अपघात झाला की, रेल्वे मंत्र्यांचा राजीनामा मागितला जातो. राजीनामा देण्याऐवजी तेथे जाऊन काय झाले, ते पाहून सुधारण्यासाठी प्रयत्न झाला पाहिजे. मात्र, तसे होत नाही, अशी टीका ठाकरे यांनी केली.

### 'राज-उद्धव एकत्र येण्याकडे अधिक लक्ष'

'मी वारंवार शहराच्या दुरवस्थेविषयी बोलतो. मात्र, त्याला महत्त्व दिले जात नाही. त्यापेक्षा राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या बातम्यांना अधिक वेळ दिला जातो,' अशी नाराजी राज ठाकरे यांनी व्यक्त केली.

# "निष्क्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची हकालपट्टी करा"

## कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची मागणी

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------




ठाण्याजवळच्या मुंब्रा स्थानकाजवळ लोकलमधून पडून ६ प्रवशांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत वेदनादायी व मनाला चटका लावणारी आहे. कामावर जाण्यासाठी जीवाची पर्वा न करता रेल्वेला लटकत प्रवास करण्याची वेळ येते हेच अत्यंत विदारक आहे. हा रेल्वे अपघात नाही तर भाजपा सरकारने घेतलेले बळी आहेत, याची चौकशी तर केलीच पाहिजे पण घटनेला जबाबदार धरून रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी, अशी मागणी प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

### काय म्हणाले हर्षवर्धन सपकाळ?

रेल्वे अपघातावर बोलताना कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, गेल्या अकरा वर्षापासून महाराष्ट्राची आणि मुंबईची जनता पायाभूत सुविधा आणि मुंबईकरांचा प्रवास सुखकर होणार या पोकळ गप्पा ऐकत आहे. सुविधा आणि विकासाच्या नावाखाली टेंडर द्या आणि कमिशन घ्या हा खेळ महाराष्ट्रात सुरु आहे. सत्ताधारी, अधिकारी आणि ठेकेदार यातून गब्बर झाले आहे पण या भ्रष्टाचाराची किंमत मात्र सर्वसामान्यांना नागरिकांना आपला जीवाने चुकती करावी लागते आहे. सरकारने आता तरी जागे होऊन, इव्हेंटबाजी सोडून मुंबईकरांचे लोकल प्रवासात जीव जाऊ नयेत यासाठी तातडीने पावले उचलावीत.

### मुंबई लोकल हीच लोकांची लाईफलाईन

मुंबई परिसरात लोकल हीच लाईफलाईन आहे, दररोज जवळपास ७५ लाख लोक लोकलने प्रवास करतात पण हा प्रवास अत्यंत खडतर व कठीण आहे. घरातून बाहेर पडलेली व्यक्ती घरी परत येईल का याची चिंता सारखी सतावत असते. लोकलमधील गर्दीमुळे दररोज अपघात होतात, कोणाचा ना कोणाचा तरी जीव जातो किंवा कायमचा जायबंदी होतो. लोकलमधील गर्दी कमी करून हा प्रवास सुखकर करावा यासाठी सातत्याने चर्चा होते, बैठका होतात पण पुन्हा 'पहिले पाढे ५५' अशी अवस्था आहे. एखादा अपघात झाली की तातडीने लोकलला बंद दरवाजे बसवण्याची घोषणा केली जाते पण कृती शून्य असते. रेल्वे प्रशासन हे मुर्दाड आहे, सुस्तावलेला अजगर आहे. सर्वच पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी सातत्याने लोकलच्या समस्यांवर आवाज उठवलेला आहे पण रेल्वे प्रशासन व सरकार यांची कुंभकर्णी झोप काही जात नाही. भाजपा सरकारला बुलेट ट्रेन प्रकल्प पूर्ण करायचा आहे, मुंबईकरांना बुलेट ट्रने नाही तर लोकल सेवा व्यवस्थित पाहिजे. पण रेल्वे प्रशासन व सरकार सर्वसामान्य मुंबईकरांच्या जीवाशी खेळत आहे आता हा खेळ थांबवा असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.


# "केंद्रीय रेल्वे प्रशासनाने घटनेची गांभीर्याने..."

## मुंबईतील लोकल दुर्घटनेवर शरद पवारांची प्रतिक्रिया

**ओम सोमवंशी**
**मुंबई प्रतिनिधी**
**दैनिक स्वराज्यदूत**

----------------------------





मुंबईजवळील दिवा-मुंब्रा रेल्वेस्थानकादरम्यान आज (९ जून) एक दुर्घटना घडली. या दुर्घटनेत लोकलमधून पडून पाच प्रवाशांचा मृत्यू झाला आहे, तर काही जण जखमी झाले आहेत. लोकलमधील गर्दीमुळे काही प्रवासी डब्याच्या दरवाजाला लटकून प्रवास करत असताना ही घटना घडल्याचं सांगितलं जात आहे. दरम्यान, या घटनेनंतर अनेकांनी संतप्त प्रतिक्रिया दिल्या आहेत. आता या घटनेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी प्रतिक्रिया देत केंद्रीय रेल्वे प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घ्यावी, असं म्हटलं आहे.

### शरद पवार काय म्हणाले?

" मध्य रेल्वेच्या दिवा आणि मुंब्रा स्थानकादरम्यान ट्रेनमधून पडून प्रवाशांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. सर्व निष्पाप प्रवाशांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. तसेच, काही प्रवाशांवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्यांच्याही प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा होवो, अशी प्रार्थना करतो. मध्य रेल्वेवर दररोज सरासरी ६ ते ७ प्रवाशांचा लोकलमधून पडून मृत्यू होतो. एका आकडेवारीनुसार समोर आलेली ही माहिती अत्यंत चिंताजनक आहे. लोकल ट्रेन्समधील वाढती गर्दी याचं मुख्य कारण असल्याचं सर्वज्ञात आहे. तरीही, असे अपघात घडल्यानंतर प्रवाशांवरच त्यांच्या मृत्यूचे खापर फोडून चालणार नाही", असं शरद पवार यांनी म्हटलं आहे. "केंद्रीय रेल्वे प्रशासनाने या दुर्दैवी घटनेची गांभीर्याने दखल घ्यायला हवी. मध्य रेल्वेनेही वेळेचं उत्तम नियोजन करून त्यानुसार महत्वांच्या मार्गांवर लोकल फेऱ्या वाढवणं गरजेचं आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबवाव्यात. वारंवार होणाऱ्या अशा अपघातांना आळा घालण्यासाठी लोकल गाड्यांमध्ये स्वयंचलित दरवाजे बसवण्याच्या निर्णयाची विहित वेळेत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे", असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

### मुंब्रा स्थानकाजवळ अपघात कसा झाला?


मध्य रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी स्वप्नील नीला यांनी या घटनेनंतर पत्रकार परिषद घेतली. मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं की "कसाऱ्याहून सीएसएमटीला जाणारी लोकल प्रवाशांनी गच्च भरली होती. काही प्रवासी फूटबोर्डवर उभे राहून प्रवास करत होते. त्याचवेळी सीएसएमटीवरून डाऊन दिशेला जाणारी एक लोकल समोरून आली. ज्या ठिकाणी या दोन्ही लोकल गाड्या एकमेकांच्या बाजूने जात होत्या तिथे दोन रेल्वेरुळांमधील अंतर कमी आहे. तसेच अनेक प्रवासी दरवाजात उभे होते, त्यांच्या पाठीवर बॅगा देखील होत्या. हे प्रवासी डाऊन दिशेने जाणाऱ्या लोकलला घासले गेले, त्यांच्या बॅगा दुसऱ्या लोकलवर आदळल्या. त्यामुळे दरवाजात उभे असलेले आठ प्रवासी खाली पडले."

# संत निवृत्तीनाथ पालखीचे उद्या पंढरपूरकडे प्रस्थान, संस्थानकडून सर्व तयारी पूर्ण

सोलापूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------





संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ आषाढी पालखी सोहळा मंगळवारी त्र्यंबकेश्वर येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर संत निवृत्तीनाथ संस्थानकडून सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे. मंगळवारी दुपारी दोन वाजता मोहन महाराज बेलापूरकर, बाळकृष्ण महाराज डावरे, जयंत महाराज गोसावी यांच्या उपस्थितीत परंपरेप्रमाणे त्र्यंबकेश्वर येथून विधिवत पूजा करून संतश्रेष्ठ निवृत्तीनाथांच्या पादुका चांदीच्या रथात ठेवण्यात येतील. प्रस्थानाच्या मिरवणुकीनंतर टाळ मृदंगाच्या गजरात श्रींचे रथातून पंढरपूरकडे प्रस्थान होईल. पालखी सोहळा हा अत्यंत वैभवशाली आणि परंपरेप्रमाणे होणार आहे. मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा पालखी सोहळ्यात काही नवीन दिंड्या सहभागी होणार आहेत. वारी मार्गामध्ये त्या सहभागी होतील. वारकऱ्यांसाठी लागणाऱ्या पाणी, पालखी तळांवरील निवासाची व्यवस्था, शौचालय, इत्यादी मूलभूत सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. पालखी सोहळ्याचा पहिला मुक्काम पेगलवाडी येथील महानिर्वाणी आखाड्यात होणार आहे. पंढरपूरपर्यंत यंदा तीन बैलजोड्या रथासाठी असून साधारणतः ३० हजार वारकरी पालखी सोहळ्याबरोबर चालणार आहेत. अहिल्यानगरीतून यात वाढ होणार असून पंढरपूरपर्यंत एक लाख वारकरी निवृत्तीनाथांच्या रथाबरोबर राहण्याची शक्यता आहे. नाशिक जिल्हा प्रशासनाच्या वतीने वारीचे नियोजन करण्यात आले आहे. वारीचा ज्या गावांमध्ये मुक्काम राहील, त्या ठिकाणी ग्रामपंचायतींना सर्व व्यवस्था करण्यास सांगण्यात आले आहे. वारीचा मुक्काम असलेल्या ठिकाणी शुध्द पिण्याचे पाणी, फिरते शौचालय, जलरोधक तंबु आदी व्यवस्था करण्यात येत आहे. आरोग्य विभागाच्या वतीने करोनाचे सावट पाहता वारीचा मुक्काम असणाऱ्या ठिकाणी वारकऱ्यांची तपासणी करण्यात येणार आहे. करोनाच्या अनुषंगाने आवश्यक असल्यास चाचणीही करण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य अधिकारी रवींद्र बागूल यांनी दिली. वारीबरोबर डॉक्टरांचे पथक असलेल्या तीन रुग्णवाहिका देण्यात येणार आहेत. त्र्यंबकेश्वर येथील संत निवृत्तीनाथ महाराज आषाढी पालखी सोहळ्याचे सर्वांना वेध लागले आहे. हा पालखी सोहळा मंगळवारी पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करणार आहे. या मार्गावर ज्या गावांमध्ये पालखीचा मुक्काम असेल, ती गावे स्वागतासाठी कधीच सज्ज झाली आहेत. वारकऱ्यांच्या अपूर्व उत्साहात निघणारा पालखी सोहळा अभूतपूर्व होण्यासाठी प्रशासकीय पातळीवरही प्रयत्न होत आहेत.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

संपादकीय

# चिनाब रेल्वे पूल, विकासाचे नवे पर्व

भारताचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काश्मीरला आता थेट रेल्वेने जाता येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जम्मू-काश्मीरमधील लाखो रहिवाशांचे स्वप्न पूर्ण केले. चिनाब नदीवर जगातील सर्वात इंच रेल्वे पूल उभारला आहे, त्याचे उद्घाटन पंतप्रधानांनी केले आणि भारतातील पहिला केबल स्टेड ब्रीज असलेल्या अंजी पुलाचेही त्यांनी उद्घाटन केले. जम्मू आणि पीर पंजलमधील उंच टेकड्या ओलांडल्यानंतर रियासी जिल्ह्यात चिनाब नदीवर ३५९ मीटर उंच आणि १३१५ मीटर लांबीचा रेल्वे पूल उभारण्यात आला आहे. चिनाब रेल्वे पुलाच्या निमित्ताने पंतप्रधानांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी, केंद्रीय विज्ञान तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंग, नायब राज्यपाल मनोज सिन्हा, मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्या उपस्थितीत काश्मीरला तब्बल ४४ हजार कोटींच्या विकास प्रकल्पांची भेट दिली. गेली अनेक वर्षे काश्मीर खोरे दहशतवादाच्या विळख्यात आहे.

गेल्या अकरा वर्षांत नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे सरकार आल्यापासून दहशतवादाविरोधात सरकारने कठोर पावले उचलली. दहशतवादाचा खात्मा करण्यासाठी पोलिसांना, सुरक्षा दलाला आणि निमलष्करी दलाला पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आहे. पुलवामा, उरी, पहलगाम अशा काही ठिकाणी दहशतवाद्यांनी हिंसाचार घडवला, रक्तपात केला पण भारताच्या सुरक्षा दलाने तेवढ्याच सडेतोडपणे त्याचा समाचार घेतला. पहलगाम हत्याकांडानंतर भारताने पाकिस्तानवर हवाई व क्षेपणास्त्रांचे हल्ले करून दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. शंभर दहशतवादी यमसदनाला पाठवले. पाकिस्तानधील प्रमुख हवाई तळांचे प्रचंड नुकसान झाले. जम्मू-काश्मीरमध्ये शांतता नांदली पाहिजे आणि काश्मिरी जनतेच्या उन्नतीसाठी विकासाच्या योजना राबवल्या पाहिजेत अशा दोन्ही आघाड्यांवर मोदी सरकार गेली अकरा वर्षे काम करीत आहे. चिनाब नदीवर उभारलेल्या रेल्वे पुलामुळे काश्मीरचा कायापालट होईल असा विश्वास पंतप्रधानांनी काश्मिरी जनतेला दिला आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला उपस्थित होते. काश्मीर खोरे हे रेल्वेने देशाशी जोडले जावे अशी त्यांची मनापासून इच्छा होती, एवढेच नव्हे तर त्यांच्या लहापणापासून म्हणजेच ते सातवी-आठवीत असल्यापासून काश्मीर खोऱ्यात रेल्वे धावली पाहिजे, हे त्यांचे स्वप्न होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ओमर अब्दुल्ला यांचे बालपणीपासूनचे स्वप्न उद्घाटनाच्या कार्यक्रमात जाहीरपणे बोलून दाखवले.

कटरा ते श्रीनगर या मार्गावर आता वंदे भारत ट्रेन धावू लागली आहे. उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला हे रेल्वेमार्गाचे स्वप्न तर पूर्ण होणारच आहे पण श्रीनगरवरून थेट नवी दिल्लीला येत्या ऑगस्ट-सप्टेंबरपासून थेट रेल्वे धावू लागेल. काश्मीर खोरे हे देशाच्या राजधानीशी रेल्वेने थेट जोडले जाणार आहे, त्याचबरोबर देशातील सर्व महत्त्वाच्या शहरांशी काश्मीर खोरे रेल्वेच्या नकाशावर येणार आहे. जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे ही भारताची प्रथमपासून भूमिका आहे. काश्मीरला देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठीच मोदी सरकारने घटनेतील ३७० व्या कलमाचे सुरक्षा कवच काढून घेतले. मोदी सरकारच्या या निर्णयाला काश्मीरमधील व देशातील कट्टरतावादी संघटनांनी व नेत्यांनी जरूर विरोध केला पण गेल्या अकरा वर्षांत काश्मीरमध्ये मोदी सरकारने विकास प्रकल्पांचा जो धडाका लावला आहे, त्यात चिनाब नदीवर उभारलेला जगातील सर्वात उंच पूल हा शिरपेचातील तुरा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे हातात तिरंगा फडकवत चिनाब रेल्वेच्या पुलावरून चालत गेले तो क्षण देशाला अभिमान वाटणारा होता. आम्ही सारे एक आहोत ही भावना दृढ निर्माण करणारा होता.

काश्मीरमध्ये धावणाऱ्या पहिल्या वंदे भारत ट्रेनला पंतप्रधान मोदींनी हिरवा झेंडा दाखवला तेव्हाही ते दृश्य टीव्हीच्या पडद्यावर बघणाऱ्या कोट्यवधी लोकांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. फ्रान्समधील आयफेल टॉवर बघायला जगभरातून पर्यटक जात असतात, दुबईतील बुर्ज खलिफा बघायला रोज हजारो लोकांची गर्दी असते तसेच काश्मीरमधील चिनाब रेल्वे पुलावरून रेल्वे प्रवासाचा आनंद लुटण्यासाठी देशातूनच नव्हे तर जगभरातून लाखो पर्यटक येतील व काश्मीरचे खोरे पुन्हा पर्यटकांच्या गर्दीने फुलून जाईल. कटरा ते श्रीनगर या रस्ते प्रवासाला साधारणत: दहा तास लागतात. आता रेल्वेने केवळ तीन तासांत श्रीनगरला पोहोचता येईल. वाटेत केवळ बनिहाल येथे वंदे भारत थांबणार आहे. नंतर मागणीनुसार अन्य थांबे ठरविण्यात येणार आहेत. गेल्या वर्षभरात भारतीय पर्यटकांची संख्या काश्मीर खोऱ्यात लक्षणीय वाढली होती. पहलगाम येथे झालेल्या हत्याकांडानंतर पर्यटकांच्या संख्येला एकदम ब्रेक लागला. आता पुन्हा काश्मीरकडे पर्यटक येऊ लागतील व भारताचे नंदनवन पुन्हा पर्यटकांनी बहरून जाईल. काश्मीरच्या निसर्गरम्य परिसरात चित्रपटांचे चित्रीकरण पुन्हा सुरू होईल आणि मैदानेही खेळाडूंनी गजबजलेली दिसतील. वेगवेगळ्या फुला-फळांनी बहरलेले बगीचे पर्यटकांना आकर्षित करतील. श्रीनगरपर्यंत थेट रेल्वे सुरू झाली आहेच पण वंदे भारत ट्रेनचा प्रवास हे आणखी आकर्षण आहे.

काश्मीर खोऱ्यात सध्या सर्वत्र इदचे वातावरण आहे. शिवाय अमरनाथ यात्रेचे वेध हिंदू भाविकांना लागले आहेत. नव्या रेल्वे मार्गामुळे श्रीनगरकडे जाताना कोणतीही अडचण राहिलेली नाही. बर्फ वृष्टी झाल्यावर जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग अनेकदा बंद होतो. कधी कधी आठ ते पंधरा दिवस रस्ते वाहतून ठप्प राहते. आता ट्रेनमुळे प्रवासी, पर्यटक, व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक यांना श्रीनगर गाठणे सोपे झाले आहे. ट्रेनचे तिकीटही वाजवी आहे. सफरचंद, चेरीसारखी फळे रेल्वेने दिल्ली व अन्य शहरांकडे पाठवणे आता सोयीचे झाले आहे. रेल्वे मार्गामुळे व्यापार व निर्यात यात विलक्षण वाढ होऊ शकते व त्यातूनच काश्मीरची समृद्धीकडे वाटचाल होऊ शकते.

# पतीवरील प्रेमाचे प्रतीक : वट पौर्णिमा



वट पौर्णिमा ज्याला वट सावित्री व्रत देखील म्हणतात. हा महाराष्ट्र, गोवा या पश्चिम भारतीय राज्यांमध्ये विवाहित महिलांनी साजरा केलेला हिंदू उत्सव आहे. तात्विक दृष्टिकोनातून, वटवृक्ष दीर्घायुष्य आणि अमरत्वाचे प्रतीक म्हणून देखील स्वीकारले जाते. वटवृक्ष हे ज्ञान आणि निर्वाणाचेही प्रतीक आहे. भगवान बुद्धांना याच झाडाखाली ज्ञान प्राप्त झाले. म्हणूनच पतीच्या दीर्घायुष्यासाठी वटवृक्षाची पूजा करणे हा या व्रताचा भाग झाला. कथा कर्माबरोबरच स्त्रिया उपवास करतात आणि पूजा करतात आणि परिक्रमेदरम्यान वटवृक्षाभोवती सुताचे धागे गुंडाळतात. एक विवाहित स्त्री तिच्या पतीवरील प्रेमाचे प्रतीक झाडाभोवती एक औपचारिक धागा बांधून दर्शवते. या व्रतामागे एक पारंपरिक सावित्री आणि सत्यवान यांची पौराणिक आख्यायिका सांगितली जाते. वटपौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करतात. पर्यावरणशास्त्राच्या दृष्टीने वडाचे महत्त्व विशेष असल्याने त्याच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा ही पूजेचा एक हेतू आहे. वट सावित्री व्रत शुभ आणि संतान प्राप्तीसाठी मदत करणारे मानले जाते. भारतीय संस्कृतीत हे व्रत आदर्श स्त्रीत्वाचे प्रतीक बनले आहे. या व्रताच्या तिथीबाबत वेगवेगळे मतप्रवाह आहेत. स्कंद पुराण आणि भविष्योत्तर पुराणानुसार ज्येष्ठ महिन्यातील शुक्ल पक्षाच्या पौर्णिमेला हे व्रत करण्याचा नियम आहे, तर निर्णयामृत वगैरेनुसार ज्येष्ठ महिन्यातील अमावास्येला उपवास करण्याचे सांगितले आहे. ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी पासून पौर्णिमेपर्यंत हे त्रिरात्र व्रत करावे असे सांगितले आहे. तीन दिवस उपवास करणे अशक्य असेल त्यांनी फक्त पौर्णिमेलाच उपवास करावा. सावित्रीसह ब्रम्हदेव ही या व्रताची मुख्य देवता असून सत्यवान-सावित्री, नारद व यमधर्म या उपांग देवता आहेत. या व्रताचा विधी असा, नदीकाठची वाळू आणून पात्रात भरावी, तिच्यावर सत्यवान आणि सावित्री यांच्या मूर्ती ठेवाव्यात मग त्यांची षोडशोपचारे पूजा करावी. त्यानंतर पाच अर्घ्ये द्यावीत, मग सवित्राची प्रार्थना करावी. पूजा झाल्यावर संध्याकाळी सुवासिनीसह सावित्रीची कथा ऐकावी. या व्रतात सावित्रीच्या मूर्तीची पूजा सांगितलेली असली तरी रूढी मात्र वेगळी आहे. सावित्रीने आंतरिक गुणांची पारख करून निवडलेल्या वरास आई-बाप आणि देवगुरू यांच्या विरोधाला डावलून माळ घातली व पतीचे प्राण वाचवण्याचे अवघड काम चिकाटीने, दुर्दम्य इच्छाशक्तीने आणि चातुर्याने करून दाखविले. योगी अरविंद यांनी आध्यात्मिक परिभाषेतून सावित्रीचे महत्त्व सांगणारे 'सावित्री' नावाचे महाकाव्य लिहिले आहे.

वटवृक्षाचे पूजन आणि सावित्री-सत्यवान कथेचे स्मरण करण्याच्या विधीमुळे हे व्रत वट सावित्री म्हणून प्रसिद्ध झाले. भारतीय संस्कृतीत सावित्रीला ऐतिहासिक पात्र मानले जाते. सावित्री म्हणजे वेदमाता गायत्री आणि सरस्वती. सावित्रीचा जन्मही विशेष परिस्थितीत झाला. भद्रा देशाचा राजा अश्वपती यांना मूलबाळ नव्हते असे म्हणतात. त्यांनी संततीप्राप्तीसाठी मंत्रोच्चारांसह दररोज एक लाख अर्पण केले. हा क्रम अठरा वर्षे चालू राहिला. यानंतर सावित्री देवी प्रकट झाली आणि वरदान दिले की, 'राजन, तुझ्या पोटी एक तेजस्वी मुलगी होईल'. सावित्रीदेवीच्या कृपेने जन्माला आल्याने मुलीचे नाव सावित्री ठेवण्यात आले. सावित्री अतिशय सुंदर, नम्र व गुणी मुलगी होती. सावित्री उपवर झाल्यावर राजाने तिलाच आपला पती निवडण्याची परवानगी दिली. सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा शाल्व राज्याचा धृमत्सेन नावाच्या अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून हरल्यामुळे आपल्या राणी व मुलासहित राजा जंगलात राहत होता. भगवान नारदाला सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच असल्याचे माहित असल्यामुळे त्यांनी त्याच्याशी लग्न करू नको असा सल्ला सावित्रीला दिला. पण सावित्रीने ते मान्य केले नाही. तिने सत्यवानाशी विवाह केला व जंगलात येऊन ती नवऱ्याबरोबर सासू सासऱ्याची सेवा करू लागली. सत्यवानाचा मृत्यू जेव्हा तीन दिवसावर येऊन ठेपला तेव्हा तिने तीन दिवस उपवास करून सावित्री व्रत आरंभिले. सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला असता सावित्री त्याच्या बरोबर गेली. लाकडे तोडता-तोडता त्याला घेरी आली व तो जमिनीवर पडला. यमधर्म तिथे आला व सत्यवानाचे प्राण नेऊ लागला. सावित्री यमाच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने अनेक वेळा सावित्रीस परत जाण्यास सांगितले. पण तिने साफ नाकारले व पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरला. अखेर कंटाळून यमाने पती सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने सासू-सासऱ्याचे डोळे व राज्य परत मागितले व आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितला. यमराजाने गफलतीने तथास्तु म्हटले. तेव्हा त्याला वचनबद्ध झाल्याची आठवण झाली व सत्यवानाचे प्राण परत करावे लागले. सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखालीच परत मिळविले म्हणून ज्येष्ठ महिन्यात पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून उपवास करतात व वट सावित्री व्रत आचरतात. सर्व पवित्र वृक्षांत वटवृक्षाचे आयुष्य जास्त असून पारंब्यांनी त्याचा विस्तारही खूप होतो. अशा वटवृक्षाची पूजा करून स्त्रिया 'मला व माझ्या पतीला आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभू दे, धनधान्य व मुले-नातू यांनी माझा प्रपंच विस्तारित व संपन्न होऊ दे', अशी प्रार्थना करतात.

सन् आहे सौभाग्याचा, बंध आहे अतूट
नात्याचा । या शुभदिनी पूर्ण होवोत
तुमच्या सर्व इच्छा ।।

--------------------------------

**वट पौर्णिमेच्या**
**हार्दिक शुभेच्छा!**
**प्रविण बागडे**
**नागपूर**

# साहेबराव नंदन तात्या तीसऱ्या जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------------



काळीज माझं साहित्य व सामाजिक साहित्य समुह छत्रपती संभाजी नगर यांच्या सामाजिक संस्थेच्या तीसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कवी संमेलन नाशिक येथे पार पडलेल्या काव्य मैफीलीत मुळगाव ताहाराबाद ह. मु. नाशिक येथील सगर समाज बांधव कवी लेखक संपादक गावगाडाकर साहेबराव नंदन तात्या यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्काराने जेष्ठ साहित्यिक चंद्रकांतदादा वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली व शुभहस्ते, तसेच कवी, संपादक गुलाबराजा फुलमाळी, गिरणा गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश पवार, साहित्यिक रविंद्रदादा मालूजंकर , संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा बेंद्रे, कवयित्री सौ. शारदा भामरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत साहेबराव नंदन तात्यांना मानाचा फेटा, शॉल श्रीफळ बुके ट्रॉफी व सन्मान पत्र देऊन टाळयांच्या गजरात सन्मानित करून गौरविण्यात आले. साहेबराव नंदन तात्यांना या आधीही अनेक राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. शेकडो सन्मान पत्रांचे ते मानकरी असून, खान्देशातील नामवंत कवी लेखक संपादक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या नावावर गावगाडा काव्य संग्रह, परिसस्पर्श कादंबरी, सगर रत्न विशेषांक , सगर सेवार्थी अंक, स्नेहबंध साहित्य विशेष , सगर दीपोत्सव दिवाळी अंक प्रसिद्ध आहेत. गावकुसाच्या मातीतील अस्सल ग्रामिणबाज असलेल्या कथा, अहिराणी कविता, अलक, लघुकथा लिहिण्यात ते माहिर आहेत. मान सन्मान पुरस्कार आणि साहेबराव नंदन तात्या हे समिकरणच होऊन बसले आहे. मध्यमवर्गीय कुटुंबातील प्रतिकुल परिस्थिती गरीबीची असली तरी साहित्य क्षेत्रात ते श्रीमंत आहेत. दिलदार मनाच्या हळव्या साहित्यिकाचा सन्मान हा खऱ्या अर्थाने खांन्देशच्या मातीचा सन्मान असल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत.

# शेतातील झुकलेल्या विद्युत पोलची दुरुस्ती करावी
# वाशीम: तालुक्यात शेतकरी नेते राम इढोळे यांची मागणी

प्रवीण उंबरकर
वाशीम प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी अंतर्गत येत असलेल्या सर्व ११ के. व्ही. च्या व एल टी च्या ताराला टाईटपणा देऊन तार ओढून घ्यावे तर झुकलेले पोल सरळ करण्यात यावेत. काही ठिकाणी ११ के.व्ही. चे पोल तर काही ठिकाणी एल टी लाईनचे पोल झुकलेले आहेत. अशा अनेक शेती भागातील शेतकऱ्यांच्या हितासाठी हिवाळी हंगामा अगोदर ही कामे करणे गरजेचे आहे जर हे कामे रिकाम्या वेळात व होईल त्यावेळी केल्या गेले तर शेतकऱ्यांना हिवाळी हंगामात त्रास होणार नाही. हिवाळी हंगामात पेरलेल्या पिकाला विद्युत वितरण कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा मिळेल अशी शेतकऱ्यांना आशा आहे. कोणतेही काम वेळेत होत नाही, त्या अगोदरच ही कामे केली तर शेतकऱ्यांना कायम दिलासा मिळेल व या केलेल्या कामामधून शेतकऱ्याचे हितच जोपासल्या जाईल. याबाबतचे सर्व आढावे/माहिती आपल्या विद्युत तंत्रज्ञा कडून सर्व माहिती घेऊन पूर्ण करावेत अशी आशा वाशीम तालुक्यातील शेतकरी नेते राम इढोळे व सर्व शेतकऱ्यांना आहे.

# वटपौर्णिमेच्या निमित्ताने व्हावे वृक्षारोपण

भारतीय संस्कृतीत प्रत्येक झाडांना आगळेवेगळे स्थान व महत्त्व आहे.त्यात वटवृक्ष म्हणजे मायेची सावली व शांतीचे प्रतीक आहे.वटपौर्णिमेला भारतीय संस्कृतीत अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.सावित्री हे भारतीय संस्कृतीत एक ऐतिहासिक पात्र मानले जाते.सावित्री म्हणजे वेद माता गायत्री आणि सरस्वती. वटवृक्ष एक विशालकाय वृक्ष आहे.ज्यामध्ये त्या झाडाची जटा लटकत असतात.यालाच सावित्री देवी मानले जाते.हिंदु पुराणात ब्रम्हा, विष्णू आणि महेश हे वटवृक्षात राहतात असे मानले जाते.या झाडांच्या मुळामध्ये ब्रम्हा, मध्यभागी विष्णू आणि वरच्या भागात शिव आहे.म्हणून या झाडाच्या पुजेला अत्यंत महत्व आहे.कारण वटवृक्षाच्या पुजेने साक्षात ब्रम्हा, विष्णू आणि महेश यांचे दर्शन होते.त्यामुळे आज आपल्याला अशाच वृक्षांची नितांत गरज आहे.यावरून स्पष्ट होते की वटवृक्ष एक दैवी शक्तीचे प्रतीक आहेच हे आपल्याला पुराण सुध्दा सांगते.परंतू आज मानवाचा व संपूर्ण जीवजंतूच्या कल्याणासाठी व जीवनमरणाचा प्रश्न ऑक्सिजनवर येवुन ठेपला आहे.कारण दिवसेंदिवस पृथ्वीतलावरील ऑक्सीजनचे प्रमाणात कमी-कमी होत आहे.यामुळे मानवासह संपूर्ण जीवजंतूचे जीवन धोकादायक स्थितीत येवून ठेपले आहे. त्यामुळे आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात वृक्षलागवडीला प्रथम प्राधान्य देणे गरजेचे आहे.कारण आपण जेवढे वटवृक्ष लावू तेवढीच ऑक्सिजनमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होवून मानव,पशुपक्षी व पृथ्वीतलावरील संपूर्ण सृष्टीत आल्हाददायक वातावरणात निर्माण होण्यास मोठी मदत होईल.आज आपण लक्षात ठेवले पाहिजे की प्रत्येक झाडात, पानात, फुलात, मुळात, फळात देवी-देवतांचा वास आहे. त्यामुळेच आपण आज या पृथ्वीतलावर सुखरूप आहोत व मोकळा श्वास घेऊ शकतो.परंतु वृक्ष तोड किंवा जंगल तोड वेळीच थांबली नाही तर पृथ्वीतलावरील संपूर्ण जीव सृष्टीचा विनाश कोणीही रोखू शकणार नाही हे सुद्धा कटु सत्य आहे. त्यामुळे प्रत्येक सनाला,वाढदिवसाला,लग्न कार्यक्रम या दिवसाला वृक्ष लागवड व्हायलाच हवी.वटपौर्णिमेप्रमाणे ३६५ दिवसांमध्ये जे कोणते सण येतात त्या-त्या सणाला वृक्षारोपण करून आगळावेगळा उपक्रम राबवायला हवा.तुळशी विवाहाच्या दिवशी तुळशीचे सुध्दा वृक्षारोपण व्हायला हवे.असे जर झाले तर देशात दरवर्षी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल व ऑक्सिजनची मात्रा वाढण्यास मोठी मदत होईल. आपण जगात किंवा भारतात जी काही औषधे पहातो ती कोणतीही असो उदाहरणार्थ ऍलोपॅथिक,आर्युवेदिक, होमिओपॅथिक किंवा जडी-बुटी या ज्या औषधी तयार होतात त्या संपूर्ण वनस्पती पासुनच तयार होतात.त्यामुळे वृक्ष लागवड काळाची गरज आहे.सावित्री आणि सत्यवान यांची कथा अनेक पुराणांमध्ये पहायला मिळते.नारद मुनी सावित्रीला सत्यवानशी लग्न न करण्याचा सल्ला देते.कारण सत्यवान यांचे जीवन काही काळापर्यंत मर्यादित असते.परंतु सावित्री नारदमुनीला न जुमानता सत्यवानशी लग्न करते.तीला पतीच्या मृत्यूची तारीख माहीत असते.अशा परिस्थितीत शिल्लक रहालेल्या दिवसात सावित्री कठोर तपश्चर्या करते.परिणामतः आपल्या पतीला मृत्यूच्या खाईतून बाहेर काढते.यामागे वटवृक्षाची लीला असते.कारण वटवृक्षांमध्ये ब्रम्हा, विष्णू आणि महेश यांचा वास आहे हे सावित्रीला तपश्चर्ये दरम्यान लक्षात आले व सावित्रीच्या मदतीसाठी स्वयंम ब्रम्हा, विष्णू आणि महेश प्रगट होतात व सावित्रीची मनोकामना पूर्ण होते.हे आपल्याला पुराणात सांगितले आहे.त्याच अनुषंगाने वटपौर्णिमेला वडाच्या झाडाची पूजा करून महिला सुख-समृध्दीची आराधना करतात व वटवृक्षाच्या रूपात विराजमान असलेले ब्रम्हा, विष्णू आणि महेश व सावित्री यांचे साक्षात दर्शन घेऊन महिला स्वतःला धन्य मानतात.परंतु आज वटवृक्षाची गरज आपणासर्वांनाच आहे.कारण सत्यवानाला वाचवीण्यासाठी सावित्रीने वटवृक्षाचा सहारा घेतला व वटवृक्षाने सावित्रीला सत्यवानाला वाचविले सुध्दा.आज आपल्याला देशाच्या १४० कोटी जनतेचे प्राण वाचवायचे आहे. यासाठी आपल्याला सुध्दा वृक्षलागवडीच्या माध्यमातून तपश्चर्या करावीच लागेल.तेव्हाच आपल्याला मोठ्या प्रमाणात ऑक्सिजनची मात्रा मिळण्यास मोठी मदत होईल व आपणा सर्वांना वटवृक्षाच्या रूपात साक्षात ब्रम्हा, विष्णू आणि महेश व सावित्री यांचे दर्शन होईल.भारतीय संस्कृतीतील कोणताही सण असो त्यामागे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक,धार्मिक, आरोग्य विषयक इत्यादींना धरून असतोच.त्यामुळे सर्वांनीच वृक्ष लागवडीकडे जास्तीत जास्त लक्ष देण्याची गरज आहे. वटवृक्ष हा मायेचा आधार आहे कारण तो सर्वांना सावली देतो. त्यामुळे वटवृक्ष हे शांतीचे व मांगल्याचे प्रतीक सुध्दा आहे. सध्याच्या परिस्थितीत पृथ्वी, जल, वायु धोकादायक स्थितीमध्ये आहे.त्यांना वाचविण्याची संपूर्ण जबाबदारी मानवाची आहे. कारण मानव हा बुध्दीजीव प्राणी आहे. आज पृथ्वीतलावर जगात जी काही विनाश लीला दिसत आहे त्याला दोषी फक्त मानवच आहे.ही विनाश लीला रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे.आज वृक्ष म्हणजे दैवी शक्तीच आहे.वड, आंबा, आवळा, कडुनिंब, उंबर, केळी, आपट्याचे झाड, बेल, पळस, कुड्याची पाने, इत्यादीसह अनेक झाडांच्या पानांचा, फुलांचा व फळांचा पुजेमध्ये वापर करीत असतो. आज स्त्री शक्ती वृक्षांना वाचवीण्यासाठी वृक्षांची पुजा अर्चना करीत आहे.तर मनुष्य दुसरीकडे जंगल तोड करीत आहे याला कुठेही थांबवायला हवे.पर्यावरण रक्षणासाठी १९७३ मध्ये चिपको आंदोलन करण्यात आले यात मोठ्या संख्येने महिलांनी भाग घेवून मोठ्या प्रमाणात वृक्षतोड थांबवीली. यामागचा उद्देश म्हणजे झाडांना वाचवीने.या आंदोलनामुळे शेकडो झाडे, हजारो पक्षी व प्राण्यांची निवासस्थाने वाचली. झाडे लावा,झाडे जगवा, निसर्ग सुरक्षित तर आपण सुरक्षित, आपण सुरक्षित तर देश सुरक्षित, देश सुरक्षित तर जग सुरक्षित हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे. यामुळे संपूर्ण सृष्टीत प्रफुल्लित होईल.वटपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**नागपूर.**

# जागतिक नेत्रदान दिवसः

एखाद्या व्यक्तीच्या शरीराचे सर्व भाग महत्वाचे असतात, परंतु डोळ्यांना यामध्ये थोडे अधिक महत्त्व असते. डोळे ही देवाची देणगी आहे. ज्याचे डोळे नसतात त्यांच्याकडूनच त्याचे मूल्य चांगले समजू शकते. मृत्यूनंतर डोळ्यांनी दान देऊन आपण कोणालाही नवीन जीवन देऊ शकता.

नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन दरवर्षी १० जून हा दिवस जगभर अंतरराष्ट्रीय दृष्टिदान दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या माध्यमातून लोकांना नेत्रदानाचे महत्त्व सांगून नेत्रदानाची जनजागृती केली जात

**उद्देश्य:**
जागतिक नेत्रदान दिनाचे उद्दिष्ट नेत्रदानाचे महत्व या बद्दलची जनजागृती करून लोकांना त्यांच्या किंवा त्यांच्या नातेवाईकांच्या मृत्यूनंतर डोळे दान प्रवृत्त करणे आहे.अंधत्व ही विकासशील देशांमध्ये प्रमुख सार्वजनिक आरोग्याच्या समस्यांपैकी मुख्य समस्या आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार (WHO) कार्नियाच संबंधित आजार, मोतीबिंदू आणि काचबिंदू नंतर होणाऱ्या दृष्टी हानि आणि अंधत्वाच्या मुख्य कारणांपैकी आहे.

मानवी जीवनात दृष्टीला प्रचंड महत्व आहे,कारण डोळे असले तर कोणतेही काम मणुष्य सहज करु शकतो, त्यामुळे 'दृष्टी आड सृष्टी' किंवा 'असेल दृष्टी तर दिसेल सृष्टी' ह्या म्हणी प्रचलित झाल्या आहेत. माणूस जगातील सृष्टी सौंदर्य आपल्या नेत्रचक्षुद्वारे अंतःकरणात साठवून ठेवू शकतो. त्यामुळे मानवाच्या पंचेंद्रिय मध्ये डोळ्यांना मानाचे स्थान आहे. डोळ्यांचा उपयोग नयनरम्य, मनोहर सृष्टीसौंदर्य आस्वाद घेण्या बरोबर त्यांची छबी सुंदर चित्राद्वारे इतरांनाही देता येते.

दृष्टीहिन मानवाला नयनसुख मिळून जगाच्या सौंदर्याचा आस्वाद घेता यावा यासाठी नेत्रदान , डोळेदान किंवा दृष्टीदान करण्याचा निर्णय प्रत्येक मानवाने केल्यास त्याचा फायदा जगातील नेत्रहिन मानवास निश्चितच होवू शकेल. अर्थात व्यक्तिने मरणोत्तर नेत्रदान केल्यास मानवी जीवनात त्याचा उपयोग अंध व्यक्तिस निश्चित होईल.

मानवी जीवनात डोळेच फक्त मरणोत्तर अंधाना मदत करू शकतात. तेव्हा दृष्टी दानामुळे एक माणूस दुसऱ्या अंध माणसाचे जीवन प्रकाशमय करून त्याला Normal life जगण्यास मदत करु शकतो.

नेत्रदानाची प्रक्रिया मृत्युच्या काही तासांमध्ये शक्यतो व्यक्तीच्या मृत्यूनंतर ६ तासांच्या आत करण्यात येते .नेत्रदानाचा निर्णय घेतलेल्या एका मृत्यू झालेल्या व्यक्तिचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येतात. त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे जीवन प्रकाशमय होते. तुम्हालाही एखाद्या व्यक्तीचे आयुष्य उजळून टाकायचे असेल तर आपल्या नजीकच्या नेत्रदान हॉस्पिटलमध्ये संपर्क करून नेत्रदानासाठी नोंदणी करू शकता.

नेत्रदान ही संकल्पना राबविण्यासाठीचा दिवस म्हणजे जागतिक दृष्टीदान दिवस होय. प्रत्येक व्यक्तीने नेत्रदानाचा संकल्प केल्यास मोठ्या प्रमाणात जगातील नेत्रहिन व्यक्तीचे दृष्टीला प्रकाशमान करु शकतील.आजच्या काळात नेत्रदान संकल्पाचा विचार आणि आचार सामान्य माणसाच्या मनावर बिंबवण्याची गरज आहे.

डोळ्यांमुळे माणसांच्या चेहऱ्यावरील हावभाव, स्वभाव प्रत्येक व्यक्ती सहज ओळखू शकतो. त्यामुळेच विविध भाषांमध्ये डोळ्यांच्या विशेषणांची गाणी झाली आहेत उदा.'डोळ्यात वाच माझ्या तू गीत भावनांचे ', 'डोळे हे जुलमी गडे रोखूनी मज पाहू नको' इ. 'डोळे' माणसाला सौंदर्याबरोबरच अनेक गोष्टी शिकवतात. डोळे इतर अवयवांपेक्षा अधिक माहिती माणसाला देतात जसे की चेहरेपट्टी वरून ओळखला जाणारा व्यक्तीचा स्वभाव, कोणत्याही गोष्टीकडे पाहण्याची दृष्टी त्यातून घेतला जाणारा बोध,त्यामुळे 'दृष्टीदाना' चे महत्व चटकन माणसाला जाणवते. 'दृष्टीहीन' या सर्व गोष्टींना मुकतो, त्यांच्या जीवनातील अंधार दूर होण्यासाठी किमान प्रत्येक व्यक्तीने मरणोत्तर नेत्रदान संकल्प करावा.

**डॉ सुधाकर संभाजीराव तहाडे**
**नेत्रतज्ञ**
**जिल्हा रुग्णालय, नांदेड.**

# सैनिक हा देशाचा आधारस्तंभ : आ.डॉ.तुषार राठोड

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
--------------------------



मौजे खैरकावाडी (गोकुळवाडी) येथील भूमिपुत्र बालाजी विनायक शिरबरतळ हे ऑपरेशन सिंदूर मध्ये यशस्वी कार्य करून भारताला विजयश्री मिळून दिली. त्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित केलेला होता. त्यासाठी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून मुखेड-कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय कार्यसम्राट आमदार डॉ. तुषार राठोड यांनी सैनिक हा देशाचा आधारस्तंभ असतो. असे प्रतिपादन करून बालाजी शिरबरतळ या सैनिकांचा त्यांच्या शुभ हस्ते सत्कार केला. यावेळी अध्यक्षस्थानी माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर डुमणे पाटील पाळेकर यांनी सैनिकाप्रती आदर दाखवून त्यांच्या विषयी गौरव उद्गार काढले. सैनिक हा शहिद झाल्यावर समाजाला कळतो. अगोदर का तो कळत नाही? सैनिकाची समाजाप्रती आदरनिष्ठा असते. देशासाठी तो आपले बलिदान देतो.समाजानेही सैनिकासाठी आपला वेळातला वेळ काढून सैनिकाचा गुणगौरव करावा. त्यांना स्फूर्ती द्यावी. असे स्फूर्तीदायी उद्गार काढले. यावेळी माजी सभापती लक्ष्मणराव पाटील खैरकेकर, व्यंकटराव लोहबंदे, गोपाळ सिंह गहिरवार (तलाठी)यांची प्रमुख उपस्थिती होती. आयोजन ग्रामस्थ व पवन कुमार शिरबरतळ यांनी केले. यावेळी केरबा शिरबरतळ, बालाजीचे वडील विनायक शिरबरतळ, माधव शिरबरतळ, शामराव गुरुजी दत्तात्रय नाईकवाड , प्रल्हाद बरसमवाड, आकाश शिरबरतळ , देविदास आयतलवाड उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.विठ्ठल बरसमवाड तर आभार विठ्ठल शिरबरतळ यांनी मांडले.

# नांदगाव शहरात डेंगू या आजाराने दोघांचा मृत्यू ; शहरात स्वच्छतेचा बोजवारा

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------

यावर्षी पावसाळा लवकर सुरू झाल्याने नांदगाव शहर आणि परिसरामध्ये ठीक ठिकाणी पाणी साचून गटारी तुंबून डास आणि मच्छर ची उत्पत्ती वाढलेली आहे त्यासोबत माशाची देखील दुर्गंधी वाढत चालली आहे सर्व बाजूने दुर्गंधी वाट चालल्याने डेंगूंचे रुग्ण वाढत चालल्याचे तक्रारी नागरिक करत आहे याकडे नांदगाव पालिका प्रशासनाने लक्ष घालावे अशी मागणी होत आहे . नांदगाव शहरात डेंगूसदृश्य आजाराने दोघांचा मृत्यू झाल्याने आरोग्य संदर्भात गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाळा सुरु होताच शहरांमध्ये अस्वच्छतेची समस्या डोके वर काढते. रस्त्यांवर साचलेले पाणी, तुंबलेले नाले, उघड्यावर पडलेला कचरा आणि त्यातून निर्माण होणारी दुर्गंधी ही परिस्थिती नागरिकांसाठी आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक ठरू लागली आहे. या अस्वच्छतेमुळे डासांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव वाढतो. डासांच्या वाढीस पोषक ठरणारे हे साचलेले पाणी डेंगू, चिकनगुनिया, मलेरिया यांसारख्या आजारांना कारणीभूत ठरत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही पावसाच्या आगमनानंतर काही आठवड्यांतच विविध रुग्णालयांमध्ये डेंगू आणि सदृश्य आजारांचे रुग्ण दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. शहरांमध्ये अनेक भागांत गटारांची सफाई न झाल्याने पावसाचे पाणी तुंबते. साचलेल्या पाण्यात अळ्या वाढतात आणि काही दिवसांतच डासांची संख्या झपाट्याने वाढते. या डासांमुळे अनेक कुटुंबांना जीवघेण्या आजारांचा सामना




करावा लागत आहे. त्यातच दुर्गंधीमुळे वातावरण असह्य बनते. नागरिकांना घरात राहणेही कठीण होते.

स्थानिक स्वराज्य संस्था, पालिका आणि आरोग्य विभाग यांनी वेळेवर स्वच्छता मोहीम, नाल्यांची सफाई, कीटकनाशक फवारणी यासारखी उपाययोजना न केल्याने ही परिस्थिती अधिक गंभीर होत आहे. लोकांनीही आपल्या परिसरात स्वच्छता ठेवणे, पाणी साचू न देणे, डास प्रतिबंधक उपाय करणे गरजेचे आहे. नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी ही केवळ प्रशासनाची नसून सर्वांचीच आहे. शहर स्वच्छ ठेवले तरच आजारांपासून सुरक्षित राहता येईल. अन्यथा पावसाळा हा सौंदर्याचा ऋतू नसून त्रासदायक काळ ठरू शकतो.

दरम्यान नांदगाव शहरातील धनगर वाड्यातील रहिवासी असलेले कृष्णा तानाजी चव्हाण हे शेतकरी दिनांक ६/६/२५ रोजी डेंगू आजारांनी निधन झाल्याचे त्यांचे कुटुंबीयांकून सांगण्यात येते. तसेच शहरातील पॉपकॉन विक्रेता होतकरू तरूण संदीप शिंदे यांचेही डेंगूसदृश आजाराने निधन झाले. नांदगाव शहरांमध्ये डेंगूची उत्पत्ती आणि रुग्णांची संख्या वाढत आहे मे महिन्यात पाऊस पडला स्वच्छतेचे कमांड दिलेले आहे हे फक्त रस्त्यावरच साफसफाई केली जाते .परंतु गल्लीबोळात फारशी सफाई होताना दिसत नाही डेंगूसदृश्य साथीच्या रोगांचा फैलाव होत असतानाही प्रशासनाकडून कोणतीही फवारणी न केल्याने डासांचे प्रमाण वाढत चालले आहे त्यामुळे दवाखान्यात गर्दी वाढत आहे परंतु शासनातर्फे यावरती कोणत्याही उपाय योजना केल्या जात नाही . अशी मौखिक तक्रार स्थानिक नागरिक करीत आहे. प्रत्येक रस्त्यावर मोकाट जनावरांची संख्या वाढल्याने त्यांचे शेण पडलेले असते . त्यामुळे दुर्गंधी पण मोठ्या प्रमाण वाढलेली आहे . ठिकठिकाणी उकिरडे कचऱ्याची डेपो पडून असतात आणि त्यामुळे त्या ठिकाणी माशा तर मोठ्या प्रमाणात आहे . शिवाय डास आणि मच्छर आणि त्यासोबत डेंगूची देखील उत्पत्ती वाढत चालली आहे यावरती जालीम उपायांची गरज असल्याचे नागरिक सांगतात . शहरातील स्वच्छता मोहीम राबवणे काळाची गरज आहे प्रशासनाने याकडे काटेकोरपणे पाऊले टाकावे अशी मागणी होत आहे

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# भटके विमुक्तांना हक्काचे घरे व जातीचे दाखले द्या या मागणीसाठी तहसीलदार यांना घेरावा

पल्लवी शेलार
श्रीगोंदा तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------------

श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव येथील जोशी वस्ती वरील आदिवासी भटके विमुक्तांचे अतिक्रमित घरे असणारी गट क्रमांक ५२/५२ वरील जागा लाभार्थ्यांच्या नावे करण्यासाठी गटविकास अधिकारी तथा सदस्य सचिव तालुका शक्ती प्रादत्त समितीची बैठक गुरुवार दि. १२ जून रोजी श्रीगोंदा येथे घेण्यात येणार आहे. तसेच भटके विमुक्तांच्या जातीच्या दाखल्याबाबत परिपूर्ण प्रस्तावाची छाननी करून उपविभागीय अधिकारी यांच्या परवानगीने सदर दाखले घेण्यासाठी येत्या १५ दिवसात कॅम्प घेण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याचे लेखी आश्वासन श्रीगोंद्याचे तहसीलदार मुदगुल यांनी आंदोलन करताना दिले.

याबाबत तहसीलदारांना दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की, श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव येथील जोशी वस्तीवरील जुना गट नंबर ५२/५२ तसेच नवीन गट नंबर २/१/५२ या क्षेत्रावर भटके मुक्त समाजाची १९९४ पासून अतिक्रमित कच्ची घर पाल व कुडाची घरे आहेत ३५० भटके मुक्त कुटुंब राहतात त्यापैकी ३५ कुटुंबांना पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरकुले मंजूर झाली आहेत परंतु सदर लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळण्यासाठी ते वास्तविक करीत असलेली जागा अतिक्रमण नियमनाकुल करून मिळावी यासाठी १६ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयानुसार उपविभागीय अधिकारी श्रीगोंदा यांच्याशी चर्चा करून शक्ती प्रदक समितीची बैठक बोलवावी व या बेघर कुटुंबांना जमीन हस्तांतरित करावी.



तसेच श्रीगोंदा तालुक्यातील आदिवासी बांधवांना जातीचे दाखले मिळावेत या मागणीसाठी भटके विमुक्त आदिवासी संयोजन समितीच्या वतीने श्रीगोंदाचे तहसीलदार मुगदुल यांना आदिवासी समाजातील महिला आदिवासी भटके मुक्त समाजातील महिलांनी घेरावा घालून आंदोलन केले. यावेळी त्यांनी उपविभागीय अधिकारी यांच्याशी चर्चा करून निर्णय घेतो असे लेखी आश्वासन दिले.

वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते ॲड. डॉ. अरुण जाधव यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनास भटक्या विमुक्त संयोजन समितीच्या सदस्या लता सावंत, पल्लवी शेलार, उमाताई जाधव, बापू ओहोळ, तुकाराम पवार, विशाल पवार, आसाराम काळे, संतोष चव्हाण, राहुल पवार, सचिन चव्हाण, आतिश पारवे, राजू शिंदे, ललिता पवार, रेशमा बागवान, शितल काळे, काजोरी पवार, डीसेना पवार, ऋषिकेश पवार, ऋषिकेश गायकवाड, अशोक मोरे, राजू भोसले, सागर शिंदे, संतोष पवार, मच्छिंद्र जाधव, राजू शिंदे, अविनाश काळे, ऋषिकेश गायकवाड यांच्यासह आदिवासी भटके विमुक्त समाजातील कार्यकर्ते उपस्थित होते.

भटके विमुक्त समाज बांधव भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या या आंदोलनास शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख मीराताई शिंदे, तालुकाप्रमुख नंदू गाडे त्याचबरोबर शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अनिल घनवट उपस्थित होते.

सकाळी ११:०० वाजल्यापासूनच श्रीगोंदा येथील शेख महंमद महाराज मंदिरापासून ढोल, ताशा, संबळ, हलगी, डफ, तुणतुणे अशा भटक्या व्यक्तांच्या पारंपारिक वाद्यासह वाजत गाजत आंदोलन करते पोलीस स्टेशन मार्गे तहसील कार्यालयाच्या प्रांगणात पोहोचले. तेथे आदिवासी भटके मुक्तांनी आपले पाल ठोको आंदोलन केले.

आवाज दो हम एक है, नया जमाना आयेगा, जमीन आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची, लढेंगे जितेंगे, आमचा लढा न्यायासाठी, माणूस म्हणून जगण्यासाठी, आमच्या हक्काचे घरकुल मिळालेच पाहिजे, अशा घोषणांनी आंदोलन करतांनी तहसील कार्यालय परिसर दणाणून सोडला.

आदिवासी भटके मुक्तांच्या संयोजन समितीच्या सदस्य लता सावंत, पारधी विकास कृती समितीचे सदस्य तुकाराम पवार, अनिल घनवट, रूपचंद सावंत, संजय सावंत यांची भाषणे झाली.अरविंद कापसे, मिराबाई शिंदे यांची भाषणे झाली. बापू ओहोळ यांनी प्रास्ताविक केले. संतोष चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. पल्लवी शेलार यांनी आभार मानले.

# साक्री बस आगार महाराष्ट्रात प्रथम प्रवासी महासंघातर्फे आगार प्रमुख व कर्मचाऱ्यांचा सत्कार- सन्मान, अभिनंदन सोहळा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

साक्री तालुका महाराष्ट्र प्रदेश प्रवासी महासंघातर्फे प्रवासी महासंघाचे राज्य अध्यक्ष श्री रणजीत श्रीगोड यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार दिनांक ४ / ६ / २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता साक्री बस आगारात आगार व्यवस्थापक सुनील महाले व त्यांचे सर्व पदाधिकारी व कर्मचारी वृंद यांचा साक्री तालुका प्रवासी महासंघातर्फे भव्य -दिव्य असा सत्कार -सन्मान व अभिनंदन सोहळा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवासी महासंघाचे तालुका अध्यक्ष सुरेश पारख होते. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ साक्री आगार व्यवस्थापक श्री सुनील गजानन महाले साहेब यांना एस टी बसचा ७७ वा वर्धापन दिन कार्यक्रमात १ जून २०२५ रोजी मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष मा. श्री प्रताप सरनाईक यांच्या शुभहस्ते -अध्यक्ष सुवर्ण पदक, प्रशस्तीपत्र गिफ्ट देऊन सन्मानित करण्यात आले. सुनील महाले यांनी एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत साक्री आगाराला सर्वात जास्त नफा मिळवून दिला .महाराष्ट्रात २५१ आगारात साक्री आगाराचा प्रथम क्रमांक आला. या प्रेरणादायी व विशेष कौतुकास्पद कार्य केल्याबद्दल बद्दल साक्री आगार व्यवस्थापक श्री सुनील महाले यांचे साक्री तालुका प्रवासी महासंघा तर्फे प्रवासी महासंघाचे अध्यक्ष सुरेश पारख उपाध्यक्ष डॉ. दिलीप चोरडिया, सौ मंगला पारख, सचिव बाळकृष्ण तोरवणे सहसचिव प्राचार्य बी एम भामरे, पी बी गांगुर्डे. एम टी ठाकरे प्राचार्य पी एस सोनवणे,प्राचार्य राजेंद्र अहिरे ,दिपक नांद्रे, दिनेश बोरसे ,ए पी दशपुते ,संजय बच्छाव,जोशीला पगारिया मॅडम ,डाॅ मनीषा पाटील यांच्या शुभ हस्ते भव्य भव्य- दिव्य असा शाल, श्रीफळ ,पुष्पगुच्छ मोतीमाळ ,भेट वस्तु देवून सत्कार- सन्मान अभिनंदन करण्यात आले.तसेच साक्री.





साक्री आगार व्यवस्थापक श्री सुनील महाले यांचा सत्कार करताना प्रवासी महासंघाचे अध्यक्ष श्री सुरेशभाऊ पारख, संचालक श्री दिनेश बोरसे मा. सरपंच कवठे, संचालक श्री संजय बच्छाव पत्रकार दैनिक स्वराज्यदूत, श्री दीपक नांद्रे.

आगारातील स्थानक प्रमुख कुणाल घरमोडे, सहाय्यक कार्यशाळा अध्यक्ष योगेश शिंगाणे, वाहतूक निरीक्षक प्रशांत अहिरे ,संघटना प्रतिनिधी फरीदादा पठाण, शरद खैरनार, साहेबराव सोनवणे , चंद्रकांत सूर्यवंशी, कुंदनलाल ठाकरे , रमेश वाघ,वाडीले साहेब ,तसेच सर्व संघटना प्रतिनिधी ,वाहक, चालक, कर्मचारी बंधू भगिनी यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार- सन्मान करण्यात आले सत्कारमूर्ती श्री सुनील महाले साहेब यांनी आपल्या सत्कारास उत्तर देताना सांगितले की हा सत्कार माझा नसून आगारातील प्रत्येक कर्मचाऱ्याचा आहे . सर्वांनी खूपच मेहनत ,कष्ट,सहकार्य केले त्यामुळेच आपण या पुरस्कारापर्यंत पोहोचू शकलो.हा मिळालेला पुरस्कार मी साक्री आगारास समर्पित करीत आहे. मी सर्वांच्या ऋणात राहू इच्छितो. तसेच प्रवासी महासंघ आम्हाला नेहमी मदत व सहकार्य करीत असतात. आमचा उत्साह वाढवत असतात. आज आमचा भव्य दिव्य सत्कार -सन्मान अभिनंदन केले त्याबद्दल त्यांचे आम्ही आभार व्यक्त करतो व भविष्यातही त्यांच्या सहकार्याची अपेक्षा करतो .प्रवासी महासंघाचे तालुका अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेश पारख यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतनातून व्यक्त केले की १२ मे २०२५ रोजी झालेल्या साक्री एस टी बस आगारात प्रवासी महासंघा तर्फे रोप कुंड्याचे लोकार्पण व फलक अनावरण कार्यक्रमात प्रवासी महासंघातर्फे आगार व्यवस्थापकांना व आगारास शुभेच्छा देण्यात आल्या होत्या. साक्री आगारातील हा प्रेरणादायीक उपक्रम महाराष्ट्रात एक नंबरचा उपक्रम ठरेल व तो शंभर टक्के यशस्वी करू. ते मनोगत आज १००% खरे ठरले आहे. यापुढेही साक्री.आगारास आपण नेहमी सहकार्य करू त्यांचा उत्साह वाढवून पुन्हा प्रथम क्रमांकाच्या पुरस्कारासाठी संधी प्राप्त करून देऊ असे प्रतिपादन सुरेश पारख यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महासंघाचे अध्यक्ष सुरेश पारख,उपाध्यक्ष डॉ दिलीप चोरडिया, सौ मंगलाताई पारख, सचिव बाळकृष्ण तोरवणे. सहसचिव प्राचार्य बी.एम भामरे ,पी बी गांगुर्डे,प्रसिद्ध प्रमुख विलास देसले ,अनिल अहिरे ,पी झेड कुवर. अँड नरेंद्र मराठे,प्राचार्य राजेंद्र अहिरे ,प्राचार्य पी एस सोनवणे. प्राध्यापक प्रदीप सावळे ,दिपक नांद्रे ,दिनेश बोरसे, ए पी दशपुते. सौ जोशीला पगारिया, डॉ. मनिषा पाटील ,डाॅ अजय नांद्रे, मनोहर भामरे, के एस अहिरे ,तुषार सुर्वे,भटु वाणी ,सुहास सोनवणे ,विजय भोसले ,प्रविण जाधव,नरेंद्र पगारे , सुरेश गवळे, फरिद पठाण व साहेबराव सोनवणे यानी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन एम टी ठाकरे यांनी केले .प्रास्ताविक सचिव बाळकृष्ण तोरवणे यांनी केले. एम टी ठाकरे ,प्राचार्य पी एस सोनवणे प्राचार्य राजेंद्र अहिरे कामगार नेते फरिद पठाण ,साहेबराव सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केलीत मनोहर भामरे यांनी आभार प्रदर्शन केले.

# राज्य शासन व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या मनमानी कारभाराच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते निलेश वाळूंज यांनी मुंडन करून उद्यापासून अन्नत्याग करण्याचा दिला गर्भित इशारा...

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------

शिरूर तालुक्यातील आमदाबाद ते मलठन रस्ता आणि कोंढाणओढा पुलावरील निकृष्ट, अपूर्ण कामाच्या निषेधार्थ सामजिक कार्यकर्ते निलेश वाळूंज यांचे बेमुदत सत्याग्रह आंदोलन सातव्या दिवशी राज्यशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मनमानी कारभाराच्या निषेधार्थ निलेश वाळूंज यांनी मुंडण आंदोलन केले तर महिलांनी आपल्या केसांचे बट कापून शासनाचा निषेध नोंदवला.

दिनांक ८ जुन रोजी सामजिक निलेश वाळूंज , सागर रासकर , दादाभाउ कुरुंदळे तसेच महिला



कार्यकर्त्या कल्पना पुंडे , युवती मान्यता वाळूंज बट कापून तर अनेक कार्यकर्त्यांनी मुंडण करून निषेध व्यक्त केला. यावेळी भाऊसाहेब लाळगे, सोमनाथ देव्हाडे ,सुनिता वाखारे , सोनाली दसगुडे, गौतम कुदळे, शेखर कुरंदळे , प्रताप दसगुडे, ज्ञानदेव कुरंदळे, अर्णव कुरुंदळे ,बबलू कुरंदळे आदी उपस्थित होते . सामाजिक कार्यकर्ते निलेश वाळुंज यांच्या सत्याग्रह आंदोलनास सामाजिक संघटना व विविध संस्था व सामान्य नागरिक यांचा उत्स्फूर्त व प्रचंड जनाधार मिळत आहे. शिरूर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या वरदहस्तामुळे ठेकेदारालाच पाठीशी घालण्याचे काम सुरू असून, तालुक्यात अनेक निकृष्ट आणि दर्जाहीन कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कृपा आशीर्वादाने सुरू आहे .सर्वात मोठा भ्रष्टाचार या खात्यात आहे परंतु शासनाला याकडे लक्ष द्यायला वेळच नाही. शिरूर तालुक्यातील आमदाबाद ते मलठण या रस्त्याच्या आणि याच रस्त्यावरील कोंढाण ओढा पुलाच्या दर्जाहीन व निकृष्ट कामाच्या सखोल चौकशीबरोबरच तालुक्याच्या इतर भागातील रस्त्यांच्या दुरवस्थेकडे व निकृष्ट कामांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते नीलेश वाळूज हे गेल्या सात दिवसांपासून शिरूर येथील तहसीलदार कार्यालयासमोर सत्याग्रह आंदोलनाच्या माध्यमातून ठिय्या देऊन बसले आहेत. मात्र, शासन स्तरावर या सत्याग्रहाची दखल घेतली जात नसल्याने रविवार दिनांक ८ जून रोजी शासनाच्या उदासीनतेच्या निषेधार्थ मुंडण करून दि.९ तारखेपासून अन्नत्याग आंदोलन करणार आहेत.

# साक्री ग्रामीण रुग्णालयात घाण व दुर्गंधीचे मोठ्या प्रमाणावर साम्राज्य नागरिकांसह नातेवाईकांचे हाल, उपसरपंच टकले यांचा आरोप

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

साक्री ग्रामीण रुग्णालयामध्ये सर्वसामान्य रुग्ण विविध उपचार घेण्यासाठी येतात. मात्र, सध्या याच सरकारी रुग्णालयामध्ये मोठ्या प्रमाणावर घाणीचे साम्राज्य पसरले आहे. ठिकठिकाणी कचरा, वाया गेलेले अन्न, बाटल्या, गुटख्याच्या पुड्या, रुग्णालयात असलेल्या शौचालयाचे मोठ्या प्रमाणावर दुर्दशा, नाल्यावरील तुटलेली झाकणे यामुळे दुर्गंधी पसरल्याने रुग्णासह त्यांच्या नातेवाइकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. रुग्णालय प्रशासनाने तातडीने यामध्ये सुधारणा करण्याची गरज निर्माण झाली आहे. तालुक्यातील कानाकोपऱ्यातून सर्वसामान्य नागरिक विविध आजारांवरील उपचारासाठी सरकारी रुग्णालयामध्ये येतात.




हे रुग्णालयात रुग्ण घेऊन गेले असताना त्यांना त्या ठिकाणी घाणेचे साम्राज्य दिसल्याने त्यांनी आपल्या मोबाईल मध्ये शौचालयात घाण असल्याचा व्हिडिओ काढत पत्रकारांना पाठवला व तीव्र शब्दात ग्रामीण रुग्णालय प्रशासनावर नाराजी व्यक्त केली रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर रुग्णांचे दुर्गंधीमुळे हाल होत आहेत परंतु रुग्णप्रशानासह लोकप्रतिनिधींचे देखील दुर्लक्ष होत असल्याचा यावेळी टकले यांनी आरोप केला.
**नामदेव टकले, उप सरपंच, दिघावे**



दररोज येथे उपचारासाठी येणाऱ्यां रुग्णांची संख्या ही सुमारे बर्या पैकी आहे. त्यामुळे येथे येणारे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांच्या संख्येचा विचार केल्यास या ठिकाणच्या परिसर, स्वच्छतागृहांची पुरती दैन्य अवस्था झाली आहे. त्यामुळे सहाजिकच या ठिकाणी कचरा, फेकलेले अन्न, बाटल्या, सिगारेटची पाकिटे, गुटख्याच्या पुड्या अशा प्रकारचा कचरा जमा होतो. रुग्णालयाचा वापर मोठ्या संख्येने होत असल्याने तेथील स्वच्छताही सातत्याने राखली जाणे गरजेचे आहे. मात्र, ठिकठिकाणी पडलेल्या कचर्या मुळे दुर्गंधी पसरली आहे. ग्रामीण रुग्णालयाच्या मागील बाजूकडे तर घाणीचे साम्राज्य असल्याने तेथे काही क्षण उभे राहणेही मुश्कील झाले आहे. याच ठिकाणी डुकरांचाही मोठ्या प्रमाणावर वावर आहे. बाहेरून उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाइकांना आसरा घ्यावा लागत असल्याचे दिसून येते.

# आतिषबाजी चंगळवादाला फाटा देत संत-महापुरुषांना अभिवादन करत पार पडला आदर्श विवाह सोहळा


## कृषिरत्न सुरेश नाना पवार यांनी समाजात विवाहाचा एक नवा आदर्श निर्माण केला.

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------

लग्न सोहळा म्हटला की, मोठ्याप्रमाणात प्रदूषणकारी फटाके, आतिषबाजी, वधू-वरांच्या मंडपातील आगमनावेळी वेगवेगळ्या सजावटीची गाडी असे चित्र आता सर्वत्र दिसू लागले आहे. याबरोबरच लग्नसोहळ्याला दिवसेंदिवस चंगळवादाचे स्वरुप येवू लागले आहे. या सर्व प्रकारामुळे आपल्या मुळ संस्कारांना आपण विसरु लागलो आहोत की काय असा प्रश्न तर निर्माण होत आहेच; पण त्याबरोबरच लग्न म्हणजे श्रीमंतीचे प्रदर्शन आणि अवास्तव स्पर्धेपोटी कर्जबाजारीपणाला आमंत्रण होऊ लागले आहे.

या परिस्थितीत सटाण्यातील एका विवाह सोहळ्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. कृषिरत्न सुरेश नाना पवार यांची पुतणी चेतना (राणी) हीचा विवाह सटाणा येथे वास्तव्यास असलेल्या गौरव भास्कर खैरणार यांच्याशी झाला. या विवाहाच्या निमित्ताने दोन्ही परिवारांनी समाजात एक नवा





आदर्श निर्माण केला. त्याची सर्वत्र चर्चा झाली. वधू-वरांच्या मंडपातील आगमनावेळी या परिवारांनी कुठल्याही प्रकारची आतिषबाजी, कोल्ड फायर प्रदर्शन, प्रदूषणकारी धूरकांडे, कर्णकर्कश फटाके आदी बाबींचा वापर न करता, महाराष्ट्राच्या शेकडो वर्षांतील सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेचा भाग असलेल्या वारकरी- भजणी मंडळीच्या समुहाच्या टाळमृदूंगांच्या गजरात वधू-वरांचे आगमन करण्यात. संत परंपरा ही सामाजिक समतेची शिकवण देणारी असल्याने या परंपरेची आठवण व्हावी या हेतूने असे अनोखे आमगन करण्यात आले.

याही पुढे आणखी एक महत्वाचा संदेश या विवाह सोहळयाच्या माध्यमातून देण्यात आला, ज्या-ज्या महामानवांनी-महामातांना आपणाला स्वराज्य, समता, स्वातंत्र्य, सामाजिक न्यायाची शिकवण दिली त्या महापुरुषांच्याच्या प्रतिमांचे पुजन करुन त्यांच्या विचारांना अभिवादन करुन या विवाहाचा पुढील विधी पार पाडण्यात आला. हा विवाह मोठ्या थाटामाटात पार पाडण्यात आला तरी, सामाजिक भान, संस्कृतीची नाळ आणि संत-महापुरुंषाप्रती व्यक्त करण्यात आलेली कृतज्ञता हा जो संदेश देण्यात आला त्याचे सर्वत्र कौतूक करण्यात आले. विवाह सोहळा किंवा उत्सव पार पाडताना कुठल्याही प्रकारची निसर्गाला हानीकारक, प्रदूषनकारी फटाके, धूरकांडे वापरु नये, अवास्तव चंगळवादाला बळी पडू नये, सोहळ्यातील आनंद टिकून रहावा, आपल्या संस्कृतीचे भान टिकवून ठेवावे असे मत यावेळी कृषिरत्न सुरेश नाना पवार यांनी व्यक्त केले.